सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र शासन

## विभागीय शिक्षण उपसंचालक मुंबई यांचे कार्यालय

नेताजी सुभाष रोड, जवाहर बालभवन, चर्नी रोड ( प ) मुंबई -४०० ००४

दुरध्वनी क्रमांक- ०२२-२३६३००८१/८६ ईमेल- **dydemumbai@yahoo.com**

---

क्र.शिउसं/माध्य-३/प्र.मा./प्र.क्र.५६/२०२३/2823 दिनांक :- 25 AUG 2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
धर्मराज जावणे एज्युकेशन ट्रस्ट,
प्लॉट नं.१५७,अंबरनाथ (पू.), जि.ठाणे.

**विषय :-** **प्रथम मान्यता मिळणेबाबत.**
होली फेथ इंग्लिश स्कुल, मौजे पाले, अंबरनाथ (पू.), जि.ठाणे

**संदर्भ :-** शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे यांचे पत्र जा.क्र./ठाजिप/शिक्षण/ माध्य/२०२३/६७८७, दि.११.०८.२०२३

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रान्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून आपल्या धर्मराज जावणे एज्युकेशन ट्रस्ट, अंबरनाथ (पू.), जि.ठाणे संचलित होली फेथ इंग्लिश स्कुल, मौजे पाले, सर्व्हे क्र.८०(१) अ आणि क, आनंदनगर एमआयडीसी जवळ, फणसेपाडा रोड अंबरनाथ (पू.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे या इंग्रजी माध्यमाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या शाळेतील माध्यमिक वर्गांना **स्वयं अर्थसहाय्यित** तत्वावर प्रथम मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास शिफारशीसह सादर करण्यात आलेला आहे.

विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत सदर शाळेस परवानगी देण्यात आलेल्या शासन मान्यता पत्रात दिलेल्या अटी, माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.३.१, ३.२ व ३.३ मधील अटी, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७ आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ नुसार तसेच, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थ सहायित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ मधील तरतूदी त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.१३.०२.२०१३ अनुसार शासनाने प्राथमिक शिक्षण, कनिष्ठ प्राथमिक, वरिष्ठ प्राथमिक, माध्यमिक शिक्षण व उच्च माध्यमिक अशा निश्चित केलेल्या स्तरानुसार सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

प्रस्तूत प्रकरणी माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.५.१ नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून आपल्या धर्मराज जावणे एज्युकेशन ट्रस्ट, अंबरनाथ (पू.), जि.ठाणे संचलित होली फेथ इंग्लिश स्कुल, मौजे पाले, सर्व्हे क्र.८०(१) अ आणि क, आनंदनगर एमआयडीसी जवळ, फणसेपाडा रोड अंबरनाथ (पू.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे या इंग्रजी माध्यमाच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमाच्या शाळेतील माध्यमिक (इ. ९ वी ते १० वी) वर्गांना सन **२०२३-२४** या शैक्षणिक वर्षापासून खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून **स्वयं अर्थसहाय्यित** तत्वावर प्रथम मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

25/08/23

(संदीप संगवे)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.

**अटी व शर्ती :-**

१. माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.४.२ नुसार प्रथम मान्यता प्राप्त झाल्यापासून पाच वर्षांच्या कालावधीनंतर नियम ३ मधील अटींची पूर्तता करून या कार्यालयाकडून **कायम मान्यता** प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

२. सर्व संबंधितांच्या माहितीकरिता माध्यमिक शाळेबाहेर कायम विना अनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन/दर्जावाढ प्राप्त शाळा असे जाहिर फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

३. **होली फेथ इंग्लिश स्कुल, मौजे पाले, सर्व्हे क्र.८०(१) अ आणि क, आनंदनगर एमआयडीसी जवळ, फणसेपाडा रोड अंबरनाथ (पू.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे** ही शाळा ज्या ठिकाणी सुरु आहे त्या जागेचा तपशिल, त्या संदर्भात आवश्यक कागदपत्रे (उदा. खरेदीखत, भाडेकरार, ७/१२, जागा नोंदणीबाबतची अद्ययावत व प्रमाणित कागदपत्रे) वारंवार तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. सदर प्रथम मान्यता ही व्यवस्थापन बदलाबाबतचा अर्ज (चेंज रिपोर्ट) व परिशिष्ट-१ पुढील तीन महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर प्रदान करण्यात येत आहे.

५. शासनाने परवानगी दिलेल्या शाळेच्या माध्यम, ठिकाण, अभ्यासक्रम इत्यादींबाबत संस्थेस शासनाच्या परवानगी शिवाय कोणताही बदल करता येणार नाही.

६. माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील सर्व तरतूदींचे तसेच शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या निर्णयांचे, नियमांचे व आदेशाचे तसेच शासनाच्या प्रचलित शैक्षणिक धोरणाचे काटेकोरपणे पालन बंधनकारक राहील.

७. शासन निर्णय दि.२७ मे २००३ मधील अटी व शर्तीची कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहील.

८. मुख्याध्यापकाच्या नियुक्तीस शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांचेकडून वैयक्तिक मान्यता घेणे बंधनकारक राहील. शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता ही शासनाने वेळोवेळी निश्चित केल्यानुसारच असेल.

९. शासनाच्या वरील आदेशानुसार शाळा जे नवीन वर्ग सुरु करणार आहे, त्या वर्गांमध्ये मुख्याध्यापकांनी न्यायालयीन आदेश व शासनाच्या निकषानुसार प्रवेश द्यावेत. प्रवेशाच्या वेळी कोणत्याही प्रकारच्या देणग्या स्विकारु नयेत.

१०. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७ महाराष्ट्र कायदा ६/८८ दि.१५/०४/१९८८ अन्वये संस्था प्रवेशाच्या वेळी अथवा तद्नंतरच्या काळात कोणतीही देणगी गोळा करणार नाही किंवा तशी सक्ती विद्यार्थी /पालक /कर्मचारी यांच्यावर करणार नाही. अन्यथा शाळेची मान्यता काढून घेण्यात येईल.

११. महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा असल्यास महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ मधील कलम ४ (१) अंतर्गत तरतूदीनुसार अनुसूची ग मध्ये विनिर्दिष्ठ केलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमार्फत मुदतठेव म्हणून ठेवलेली रक्कम ही दाननिधी निर्माण करण्यासाठीची प्रतिभूती ठेव म्हणून व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांच्या नावे संयुक्तरित्या ठेवलेली असून सदर प्रमाणपत्र किंवा ठेव संबंधित शिक्षण निरीक्षक/शिक्षणाधिकारी यांच्याकडे पुढील नुतनीकरणाच्या अटीच्या अधिनतेने, किमान तीन वर्षाच्या कालावधीसाठी तारण म्हणून ठेवण्यात आलेली असावी.

१२. शाळेमध्ये मंजूर केलेल्या कर्मचारी संचानुसार व्यवस्थापनाने शासन निर्णय दि.०६.०२.२०१२ मधील कार्यपध्दतीनुसार शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती करावी. सदर नेमणूक करताना नियमानुसार अल्पसंख्याक/मागासवर्गीयांसाठी ठरविण्यात आलेल्या प्रमाणाचे काटेकोरपणे पालन करावे.

१३. दरवर्षी कर्मचारी संच मंजूर करुन घ्यावा.

१४. शाळेतील सर्वप्रकारच्या नोंदवह्या, शालेय कर्मचारी वर्गाची सेवापुस्तके, गोपनीय अहवाल, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठतासुची अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे व तपासणीच्या वेळी अधिकाऱ्यांनी मागणी करताच सदर अभिलेख त्यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावेत.

१५. शाळेतील विद्यार्थ्यांना पोषक वातावरण, स्वच्छ प्रकाश, मोकळी हवा, योग्य इमारत, सुसज्ज ग्रंथालय/ प्रयोगशाळा, स्वतंत्र शिक्षक कक्ष इत्यादी असणे आवश्यक आहे.

१६. शिक्षणाचा स्तर, शिक्षणाच्या सोयी, आरोग्य विषयक सुविधा प्रमाणित केल्याप्रमाणे असाव्यात. तसेच शासन निर्णय दि.२९.०६.२०१३ नुसार विद्यार्थीसंख्येच्या प्रमाणात मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह (युनिट) असणे आवश्यक आहे.

१७.शाळा कायम विनाअनुदानित अथवा स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर असल्यास संस्थेने/व्यवस्थापनाने शासनाने अशासकीय अनुदान प्राप्त शाळांसाठी वेळोवेळी निर्धारित केलेल्या वेतन श्रेणी व भत्ते या प्रमाणे शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते अदा करावेत.

१८.शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते बँकेमार्फत अदा करावेत. तसेच कर्मचाऱ्यांचे अंशदायी भविष्य निर्वाह निधीची योजनेचे खाते सुरु करण्यात यावेत.

१९. शाळेची इमारत ही पूरेशी व शैक्षणिकदृष्ट्या योग्य अशी उपलब्ध असून शासन निर्णय दि.०३.११.२००९ च्या नॅशनल बिल्डिंग कोड २००५ नुसार असल्याचे प्रमाणपत्र घेतलेले असावे. त्याचे वेळोवेळी सक्षम प्राधिकाऱ्याकडून/प्राधिकरणाकडून नुतनीकरण करून घेण्यात यावे.

२०.शासन निर्णय दि.२४.०८.२०१० मधील तरतूदीनुसार शिक्षक पालक संघटनेची स्थापना शाळा समितीची वेळोवेळी स्थापना करुन शालेय समितीच्या वर्षातून किमान ६ सभा घेऊन इतिवृत्त तयार ठेवावे.

२१. माध्यमिक शाळा संहिता (सुधारित आवृती १९८६) मधील नियम ७.६ नुसार व्यवस्थापन त्यांनी चालविलेली कोणतीही शाळा सध्याच्या ठिकाणाहून कोणत्याही कारणासाठी शासनाची लेखी पूर्व-परवानगी घेतल्याशिवाय इतर कोणत्याही ठिकाणी हलवणार नाही. जर व्यवस्थापनाने शासनाच्या अधिकृतपणे हलविण्याच्या कारणावरून अशा शाळेची मान्यता आपोआप काढून घेण्यात आली असे गृहित धरण्यात येईल. (शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग दि.२४.०७.१९८१)

२२. **धर्मराज जावणे एज्युकेशन ट्रस्ट, अंबरनाथ (पू.), जि.ठाणे** संचलित **होली फेथ इंग्लिश स्कुल, मौजे पाले, सर्व्हे क्र.८०(१) अ आणि क, आनंदनगर एमआयडीसी जवळ, फणसेपाडा रोड अंबरनाथ (पू.), ता.अंबरनाथ, जि.ठाणे** या शाळेच्या मान्यतेसाठी प्रस्तावासोबत सादर केलेली माहिती/कागदपत्रे यांच्याबाबत भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास वा कोणतीही प्रशासकीय प्रतिकुलता निर्माण झाल्यास सदर मान्यता आदेश तात्काळ प्रभावाने आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

**प्रत माहितीस्तव :-**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

11 SEP 2023

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ 67AA 169377

उप कोषागार कार्यालय, उल्हासनगर
मुद्रांक पुरवठा दिनांक
29 AUG 2023
उप कोषागार अधिकारी, उल्हासनगर
29/8/2023

11 SEP 2023

NOTARY
ADV.
TAL. AMBERNATH
DIST. THANE.
MAHARASHTRA
REG. NO. 16210
EXP. DT. 27-01-2025
GOVT. OF INDIA

Government of Maharashtra

Office of Divisional Deputy Director Education Mumbai

Netaj Subhash Road, Javahar Balbhavan.
Charni Road (E) Mumbai - 400004
Telephone No: 022-23.630081/86
Email- dydemumbai@yahoo.com

---

No-Sds/sec -3/PM/PM/PN056/2023/2823 Date 25 Aug 2023
(क्र. शिउस / माध्य-3 प्र.मा / प्र. क्र. 56/2023/2823)

President/Secretary
Dharmraj Jawane Educational Trust,
Plot No 157, Ambarnath (E) Dist-Thane

20रु. COURT FEE भारत बीस रुपये Rs.20 TWENTY RUPEES

5रु. कोर्ट फी COURT FEE INDIA Rs.5 FIVE RUPEES

Sub: - Application for Recognition Certificate to Holy Faith English school, At pale Ambarnath(E) Dist-Thane

Reference:- Letter of Education officer (secondary) Zilha Parishad Thane/
Outward No /T2P/Education/sec/2013/6787 Date 11/08/2023
(जा क्र। ठाजिप/शिक्षण / माध्य / 2023/6787 Date-11/08/2023

With above subject and reference letter of Education officer (secondary) your Dharmraj Jawane Education Trust Managed Holy Faith English School at Pale survey No 80 (1) A and C Near Anandnagar MIDC, Phansipada Road Ambarnath (E) Ta Ambarnath Dist Thane.
A proposal with recommendation from your office is received for granting Recognition to this English medium CBSE Curriculam School for Secondary Classes on self-finance basis.
For this Subject, under Maharashtra Self-financed School (Establishment and Regulation) Act 2012 Recognition is given to this school with condition in the Recognition letter, conditions in Secondary school code Rule No 3.1, 3.2 and 3.3, Maharashtra private school Employee (Terms of Service) as per manual 1981 and Right of children to free and compulsory Education Act-2009 and provisions in Maharashtra self-financed school (Establishment and Regulation) Act 2012, equally refers to Govt decision Date 13/02/2013 accordingly all the Provisions fixed by Govt. at Primary Education, Lower Primary, higher Primary Secondary Education and higher Secondary at all levels to be followed is Mandatory.
In this case using the power confirm at school code Rule No 5.1 to your school Holy Faith English School Managed by Dharmraj Jawane Educational Trust Survey No 80 (1) A and C Near Anandnagar MIDC, Phansipada Road, Ambarnath (E) Ta. Ambarnath Dist. Thane for this English Medium, CBSE Curriculum, Secondary School (grade 9 and 10) Recognition is given from educational year 2023-24 with Conditions and self-finance basis.

Sandip Sangve
Divisional Deputy Director
Mumbai

NOTARY
ADV.
VASANT P. KATARNAVARE
TAL. AMBERNATH
DIST. THANE.
MAHARASHTRA
REG. NO. 16210
EXP. DT. 27-01-2025
GOVT. OF INDIA

Conditions:-

1) As per secondary school code Rule No 4.2. from time to time of five years after Recognition received, school is required to comply conditions in Rule 3 and get final Recognition from this office is mandatory.

2) For the information of all concern on permanenty basis unaided /self-financed. Newly Recognised /upgradation holder School is required to be shown on the board outside the school building.

3) Holy Faith English School at Pale Survey. No 80(1) A and C Near Anandnagar MIDC Phansipada Road, Ambarnath (E) Ta Ambarnath Dist. Thane. Details of School where it started, in this context all necessary documents (e.g. Registry paper, lease deed, 7/12, Latest Land registration and certified papers) required to be available by trust at the time of inspection is mandatory.

4) This recognition is granted on the Condition that application for change if any in management (change Report) and Appendix -1 will be submitted in next three months.

5)School will not do any change in School's medium, place, curriculum etc without Govt. Permission.

6) Secondary school code, and Maharashtra Private school employee (service conditions) Manual 1981 and all the provisions in Right to children's Free and compulsory Education Act 2009 and Govt decisions Rules and orders released time to time and existing polices of Govt. should be followed Strictly.

7) All the terms and working procedure in Govt decision Date 27 May 2003 is binding to institute.

8) Permission of Education inspector/ Education officer is required for appointment of Head master. Educational qualification of Teacher/ Non-teaching staff will be as per decided by Govt. time to time.

9) As per Govt order School will start new classes and in such new classes Head master is required to give admission considering Court orders and criteria set by Govt

10) Maharashtra Education Institute (Restriction for capitation fees) Act 1987 Maharashtra Rule 6/88 Date 15/04/1988, with this Rule School at the time of admission and after that will not collect any type of capitation fees or will not force student / parent/ Employee for that.

11) If school is self-financed, Maharashtra self-financed School Establishment and Regulation Act 2012 part 4(1) Under Schedule G Specified amount is required to be kept in National Bank as a fixed deposit This Fix amount is security deposit to make donation fund and fixed deposit will be in the joint account of management and Concern Education inspector / Education Officer and this F.D. certificate or amount is required to deposit with guarantee to Concern Education inspector / Education officer on condition for renewal on for minimum three years duration.

12) School Management should recruit Teachers 1 non-Teaching staff as per. Employee Sanctions for Employee received to school and with Procedure in Govt. decision Date. 11/0/2/06/02/2012. While doing such -recruitment Ratio decided for Minority / Backward class should be adhered very strictly.

13) Every year take Sanction for appointment of Employee.

NOTARY
VASANT P. KATARNAVARE
TAL. AMBERNATH
DIST. THANE
MAHARASHTRA
REG. NO. 16210
EXP. DT. 27-01-2025
GOVT. OF INDIA

14) In the school all types of registers, Service books of all employees, confidential report, Seniority list of Teacher and Non-teaching staff is required to be kept updated and should be make available to officer at the time of inspection.

15) For Students healthy atmosphere, clean light, fresh Air, good building, well equipped Library, Laboratory, separate Teacher's room etc should be available in the school.

16) Education standard, Education facilities. Health and hygiene facilities should be as per norms and Govt decision date 29/06/2013 Separate toilets for girls and boys are required in Proportionate to number of students.

17) If School is permanently unaided /self-financed basis the institute / Management should pay payment and allowances to teachers / non-teaching Staff in the school as per Govt. decided time to time as for private aided schools.

18) Payment and allowances for Teachers/ non-teaching staff should be paid through Bank and Employees Provident Funds scheme account should be opened for Employees. 19)School building is required enough and in good condition available for Education purpose and should have certificate as per Govt. decision dated 03/11/2009 National Building code 2005. renewal of this should be done from authority.

20) As per Govt. decision Date 24/08/2010- parents Teachers Association and School Management committee should be formed and minimum 6 meetings of school Management Committee are required to be taken and minutes be kept ready.

21) According to Secondary school code (Revised adition 1986) Rule 7.6 Management will not shift School from existing place to another place without written Permission of Govt. If school is Shifted without Govt permission, Recognition given to school will So be considered Cancel.

22) Holy Faith English School managed by Dharmraj Jawane Educational Trust, Ambarnath (E) Dist Thane at Pale Survey No 80 (1) A and C Near Anandnagar MIDC, Phansipada Road Ambarnath (E) Ta. Ambarnath Dist. Thane For this school If any court issue arised în future regarding documents submitted with Recognition proposal or any administration adversity arised. This Recognition order will be considered Cancel with immediate effect.

Copy for information: -
Education officer (Secondary) Thane

Traslated by
Haribhau Dharmraj Jawane

NOTARY
ADV.
VASANT P. KATARNAVARE
TAL. AMBERNATH
DIST. THANE
MAHARASHTRA
REG. NO. 16210
EXP. DT. 27-01-2025
GOVT. OF INDIA

TRUE TRANSLATION

VASANT P. KATARNAVARE
Advocate & Notary
GOVT. OF INDIA
Reg. No. 16210